## इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.

### वाहन विभाग

### जाहीर निविदा क्र. ०२ / २०२५-२६

गणेशोत्सव काळांत विसर्जित केलेल्या गणेश मूर्तींची तसेच निर्माल्याची वाहतूक करण्यासाठी ट्रॅक्टर, ट्रॉली व १२ टनी टिप्पर या प्रकारातील तत्सम वाहने भाड्याने घेणेकामीकामी मक्तेदार किंवा व्यावसायिक यांचेकडून निविदा मागविणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | निविदा अर्जाची किंमत रुपये | बयाणा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | गणेशोत्सव काळांत विसर्जित केलेल्या गणेश मूर्तींची तसेच निर्माल्याची वाहतूक करण्यासाठी ट्रॅक्टर, ट्रॉली व १२ टनी टिप्पर या प्रकारातील तत्सम वाहने भाडेतत्वावर पुरविणे. | रु.५९० /- ( जी.एसं.टी. सह ) | रु.९,९३१/- | १५ दिवस |

वरील कामी दुहेरी लिफाफा पद्धतीचा अवलंब करणेत येत आहे.

अ) तांत्रिक बोलीसाठी लिफाफा क्र.१ मध्ये खालील कागदपत्रांच्या स्कॅन कॉपीज अपलोड कराव्या लागतील.

१) बयाणा रक्कम व टेंडर फॉर्म फी भरलेची सत्यप्रत.

२) शासन संस्थेकडील रजिस्ट्रेशन किंवा शॉप अॅक्ट लायसन्स किंवा उद्योग आधार सत्यप्रत.

३) मक्तेदार पॅनकार्ड सत्यप्रत.

४) जी.एस.टी. रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट सत्यप्रत

६) निविदाकाराच्या वतीने कोणास प्राधिकृत केलेले असलेस त्याबाबत कुल मुखत्यारपत्र.

9) पदाधिका-याचा सहभाग नसलेबाबत प्रमाणपत्र

10) मक्तेदाराने जोडावयाचा फॉर्म 1B ( रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर )

वरील सर्व कागदपत्रांची सत्यप्रत ( Self Attested ) करून जोडणेची आहेत.

**अटी व शर्ती –**

१) तांत्रिक बोलीमध्ये निविदा धारक पात्र ठरल्यास वित्तीय बोलीचा लिफाफा क्र.२ उघडणेत येईल.

२) सोबत जोडलेल्या निविदा फॉर्म क्र.२ वाणिज्यिक लिफाफा मधील अटी शर्ती नुसार वित्तीय बोलीच्या लिफाफ्यामध्ये दर देणेत यावेत.

३) मक्तेदाराने निविदेमधील दर सर्व शासकीय करासह देणेचे आहेत.

४) सदर कामी मंजूर निविदा रक्कमेच्या ४% सुरक्षा ठेव रक्कम वरील कामाचे देयकातून दयावी. तसेच बयाणा व सुरक्षा ठेव रक्कम ही वरील काम पुर्ण झाले नंतर सहा महिन्यांनी कामाची प्रत योग्यरीत्या असल्याची खात्री झाल्यानंतर परत मिळेल.

५) बयाना व सुरक्षा डिपॉझीट रक्कमेवर व्याज मिळणार नाही.

६) मा.आयुक्त यांना कोणतेही कारण न देता निविदा मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार असेल.

७) कार्यादेश दिल्यानंतर १५ दिवसासाठी वाहन पुरवठा करणे बंधनकारक आहे.

८) वाहनांची संख्या व प्रकार आवश्यकतेनुसार कमी अथवा जास्त होऊ शकतील. वाहनांच्या पार्किंग व्यवस्था आपल्या स्तरावर करावी. तथापि अपवादात्मक स्थितीतच जागेची अडचण असल्यास तशी पूर्व सुचना महानगरपालिकेस दिल्यास जागा उपलब्धतेनुसार याकामी मदत केली जाईल.

९) वाहन स्वच्छ व उत्कृष्ट देखभाल केलेले असावे तसेच ते नजीकच्या मॉडेलचे असावे.

१०) जी वाहने महापालिकेस पुरवठा करण्यात येणार आहेत. त्या वाहनांची प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील अद्ययावत कागदपत्रे, (आरसी व टीसी हवा प्रदूषण प्रमाणपत्र. विमा पॉलिसी, वाहनचालकाचे लायसन्स इ. ची साक्षांकित / छायांकित प्रत महापालिकेच्या संबंधित विभागाकडे देणे तसेच सदरची सर्व कागदपत्रे संबंधित वाहनात ठेवणेत यावीत. जेणेकरून भविष्यात आरटीओ कडून तपासणी झालेस व कागदपत्र सादर न केलेस होणाऱ्या दंडात्मक कारवाईस संबंधित मक्तेदार जबाबदार राहील.

११) वाहनांचे इंधन, ऑइल, इलेक्ट्रिक चार्जिंग, वाहनांची दुरुस्ती (सर्विसिंग) विमा पॉलिसी व सर्व शासकीय कर, तसेच नियमानुसार वाहनचालकाचा पगार व त्यांच्या विम्यासह वाहनाचा घसारा, टोलचार्जेस इ. सर्व बाबींचा खर्च ठेकेदाराने करावयाचा आहे.

१२) वाहनाचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ठेकेदाराची / वाहन मालकाची राहील. तसेच नैसर्गिक आपत्ती, दंगल, दगडफेक, जाळपोळ, यामुळे वाहनाचे कोणतेही नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्याबाबत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई महानगरपालिकेमार्फत मिळणार नाही.

१३) डिझेल, पेट्रोल, ऑइल, वीज युनिट इत्यादी दरात वाढ झाल्यास मंजूर दरानेच वाहनांचा पुरवठा करावा लागेल त्याकरिता अतिरिक्त (जादा)दर आकारता येणार नाही.

१४) निविदा धारकाने महानगरपालिकेकडे पुरवणेत आलेल्या वाहनांमध्ये काही बदल करावयाचा असल्यास तशी इकडील पूर्व मंजुरी घेणे आवश्यक असेल.

१५) इतर कोणत्याही कारणाने वाहन उपलब्ध नसल्यास अशावेळी संबंधित वाहनाच्या बाजार भावाप्रमाणे प्रती किमी दर इतका प्रतिदिन दंड आकारण्यात येईल.

१६) वाहनावर "इचलकरंजी महानगरपालिका सेवार्थ" ON DUTY I.M.C. व विभागाचे नाव याचा फलक लावणे बंधनकारक राहील. महानगरपालिकेच्या नावाचा वापर करून अनधिकृतपणे वापर केल्याचे आढळून आल्यास कायदेशीर रित्या ठेकेदारावर कारवाई करण्यात येईल.

१७) वाहनाचे किलोमीटर /.तास मोजणी महापालिकेच्या कार्यालयापासून धरण्यात येईल व दिवसाच्या शेवटची मोजणी महापालिकेच्या कार्यालयात घेण्यात येईल.

१८) शासनाचे प्रचलित शासन निर्णयानुसार देयकातून शासकीय कर आकारणी करण्यात येईल.

१९) वाहन नादुरुस्त झाल्यास ते त्वरित दुरुस्त करून घेण्यात यावे. तसेच कार्यालयाची गैरसोय होऊ नये म्हणून त्या कालावधी करिता तात्पुरत्या स्वरूपात पर्यायी वाहन तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावे. दिलेले पर्यायी वाहन योग्य नसल्यास ते नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेचा राहील. अशी पर्यायी वाहने योग्य त्या आरटीओ व विमा कागदपत्रासह असावेत सदरच्या सर्व अटी व शर्ती त्यास लागू राहतील.

२०) पुरविण्यात येणाऱ्या वाहन चालकाची वर्तणूक ही चांगली असली पाहिजे. कोणत्याही वाहनचालका विरुद्ध महानगरपालिकेच्या कर्मचारी /अधिकारी यांची तक्रार आल्यास दोन दिवसात त्या वाहन चालका ऐवजी नवीन वाहन चालक पुरवण्याची जबाबदारी निविदा धारकाची असेल.

२१) पुरवठादाराने करारनामा लिहून दिल्यावर महानगरपालिकेच्या लेखी आदेशानुसार ठरवून दिलेल्या अथवा मागणी केलेल्या वाहनांचा तात्काळ पुरवठा केला पाहिजे.

२२) महानगरपालिकेने लेखी आदेश दिल्याप्रमाणे पुरवठादाराने विहित मुदतीत आवश्यक वाहनांचा पुरवठा वेळेत करणेचा आहे तसे न केल्यास महानगरपालिका इतर कोणत्याही पुरवठा दाराकडून सदरचे वाहन बाजारभावाने भाड्याने घेतले जाईल व त्या वाहनाचे देयक ठेकेदाराकडून वसूल केले जाईल.

२३) उपरोक्त अटी व शर्तीचा भंग झाल्यास रुपये १,०००/- प्रतिदिन मा. आयुक्तसो यांचे आदेशाप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

२४) वाहनांचे देयक काम पूर्ण झाल्यानंतर सादर करण्यात यावे. सदरचे लॉगबुक विभागप्रमुख, वाहन विभाग यांचे मार्फत प्रमाणित करून कार्यादेश प्रतसह देयकासोबत सादर करावे. महापालिकेच्या आर्थिक स्थिती नुसार देयक अदा करण्यात येईल. याबाबत विलंब आकार दिला जाणार नाही आणि त्यासाठी न्यायालयात जाता येणार नाही.

२५) वाहनांचे देयक काम पूर्ण झाल्यानंतर सादर करण्यात यावे. सदरचे लॉगबुक विभागप्रमुख, वाहन विभाग यांचे मार्फत प्रमाणित करून कार्यादेश प्रतसह देयकासोबत सादर करावे. महापालिकेच्या आर्थिक स्थिती नुसार देयक अदा करण्यात येईल. याबाबत विलंब आकार दिला जाणार नाही आणि त्यासाठी न्यायालयात जाता येणार नाही.

२६) पुरवठा करण्यात येणाऱ्या वाहनांच्या नियंत्रणा करिता निविदा धारकांनी स्वतंत्ररित्या कार्यालयामध्ये नियंत्रण अधिकाऱ्याची नियुक्ती करावी

२७) कराराप्रमाणे वाहने न पुरविल्यास निविदा व करार रद्द करण्यात येईल व बयाना तसेच सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२८) पुरविण्यात येणारी वाहने दुसऱ्याच्या मालकी हक्काचे असतील तर इतरांकडून भाड्याने घेतलेल्या वाहनांची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील तसेच त्यांच्याशी झालेल्या करार पत्राच्या प्रति कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

२९) या निविदेच्या व्यवहाराबाबत जी नोटीस, समज, ऑर्डर अगर पत्र ठेकेदारास दिले जाईल किंवा ते समक्ष न भेटल्यास अगर भेटून घेण्याचे त्यांनी टाळल्यास ती नोटीस, समज, ऑर्डर अगर पत्र त्यांनी निविदेमध्ये दिलेल्या पत्त्यातील इमारतीच्या दर्शनी भागात चिकटविण्यात येईल व अशा तऱ्हेने बजावणी करण्यात येईल. तसेच त्याचप्रमाणे बजावणी केल्यानंतर सदरची नोटीस, समज, अगर ऑर्डर अगर पत्र ठेकेदारास मिळाले असे समजण्यात येईल.

३०) याप्रकरणी उभय पक्षांमध्ये कुठल्याही विषयाबाबत वाद निर्माण झाल्यास सदर वाद Arbitration) Act 1996 प्रमाणे चालेल त्याचप्रमाणे कराराच्या अन्वये कालावधीत काही वाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त इचलकरंजी महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील व ठेकेदारास तो मान्य करणे बंधनकारक राहील.

३१) कोरी निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दि.२२/०८/२०२५ रोजी स.११.०० वाजले पासून दि.२९/०८/२०२५ रोजी दु.०३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पाहावयास मिळतील.

३२) भरलेली निविदा सादर करण्याचा अंतिम दि.२९/०८/२०२५ दु.०३.०० वाजेपर्यंत राहील. शक्य झालेस निविदा दि.२९/०८/२०२५ रोजी साय.०४.०० वा.उपस्थित मक्तेदाराच्या समोर ऑनलाईन पद्धतीने उघडण्यात येतील.

३३) सदर कामासंबंधी अधिक माहिती संबंधित वाहन विभागाकडे पाहावयास मिळेल.

| | | | |
|---|---|---|---|
| प्र. वाहन अधिक्षक | मुख्य लेखापरीक्षक | मुख्य लेखाधिकारी | उपायुक्त |
| इचलकरंजी महानगरपालिका | इचलकरंजी महानगरपालिका | इचलकरंजी महानगरपालिका | इचलकरंजी महानगरपालिका |

# इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.
## वाहन विभाग
## जाहीर निविदा क्र. ०२ / २०२५-२६

इचलकरंजी महानगरपालिका जाहीर निविदेद्वारे खालील कामांकरिता निविदा मागवित आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | निविदा रक्कम | बयाणा रक्कम | निविदा फॉर्म रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | गणेशोत्सव काळांत विसर्जित केलेल्या गणेश मूर्तींची तसेच निर्माल्याची वाहतूक करण्यासाठी ट्रॅक्टर, ट्रॉली व १२ टनी टिप्पर या प्रकारातील तत्सम वाहने भाडेतत्वावर पुरविणे. | रु. ९,९३,१२०/- (जी.एस.टी. सह) | रु ९,९३१/- | रु. ५९०/- | १५ दिवस |

१. कोरी निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दि.२२/०८/२०२५ रोजी स. ११.०० वाजले पासून दि.२६/०८/२०२५ रोजी दु.०३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पाहावयास मिळतील.

२. भरलेली निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि२६/०८/२०२५ दु. ०३.०० वाजेपर्यंत राहील. शक्य झालेस निविदा दि. २८/०८/२०२५ रोजी सायंकाळी ०४.०० वा. उपस्थित मक्तेदारांच्या समोर उघडण्यात येतील.

३. कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार आयुक्त इचलकरंजी महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

४. उपरोक्त निविदेसंदर्भात अधिक माहिती इचलकरंजी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्र.वाहन अधिक्षक
इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

# वाणिज्यिक लिफाफा

**(निविदा फॉर्म क्रमांक - २)**

**कामाचे नाव :- गणेशोत्सव काळांत विसर्जित केलेल्या गणेश मूर्तींची तसेच निर्माल्याची वाहतूक करण्यासाठी ट्रॅक्टर, ट्रॉली व १२ टनी टिप्पर या प्रकारातील तत्सम वाहने भाडेतत्वावर पुरविणे.**

निविदाधारकाचे नाव व पत्ता :- ______________________________

______________________________

| वाहन प्रकार | दैनंदिन २४ तास प्रमाणे (वाहनचालक व इंधनासह) |
|---|---|
| १) १२ टन टिपर ( तत्सम ) | |
| २) ट्रॅक्टर-ट्रॉली | |

दि. :- / /२०२५

निविदाधारकाची स्वाक्षरी
(नाव, शिक्का व पूर्ण पत्ता)